# शाहू शिक्षण संस्था, शहाड येथे महाराष्ट्राच्या विकासाचे महामंथन

**कल्याण :** १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधुन शाहू शिक्षण संस्था, शहाड येथील महाविद्यालयात "महाराष्ट्राचा झालेला विकास व भविष्यातील विकास " या विषयावर विचार मंथन केले गेले.

१ मे रोजी सकाळी महाविद्यालयात शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके सर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी संस्थेच्या B.Ed, Jounior, Senior, Law असे सर्व शाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व प्राध्यापकांनी मिळून महाराष्ट्र गीत सादर केले.

त्यानंतर झालेल्या सभेत प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या इतिहासाचा मागोवा घेतला गेला. मोनो, मेट्रो प्रकल्प मुंबई च्या विकासासाठी उपयुक्त यावर दोन्ही बाजूंनी विचार मांडले गेले. जैतापूर प्रकल्प, नाणार प्रकल्प यावरही प्राध्यापकांनी आपापली मते मांडली. सर्व प्राध्यापकांनी या सभेस उस्फुर्त प्रतिसाद दिला. संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्थानिक पातळीवरील कार्य ते जागतिक पातळीवर कार्य त्याचे विकासात्मक कार्यक्रमात महत्त्व विशद केले. कामगारांचे प्रश्नही मांडले, वैयक्तिक विकासाबरोबरच राज्याचाही विकास साधता येईल. मात्र त्यासाठी सर्वांनी मिळून एकत्र येऊन एकजुटीने काम केले पाहिजे, असे आवाहन केले. या वैचारिक सभेची सांगता अल्पोपहाराने झाली.

Scanned with OKEN Scanner

# 'रस्त्यावरील छेडछाड विरुद्ध प्रतिबंध' या विषयावर मार्गदर्शन



**कल्याण, दि. ११ :** शाहू शिक्षण संस्थेचे मातोश्री वेलबाई देवजी हरिया महाविद्यालयातील महिला विकास मंच आणि आयक्यू ए सी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना रस्त्यावर होणाऱ्या छेडछाडविरुद्ध प्रतिबंध या विषयी ॲक्शनएड या संघटनेचे सल्लागार, प्रशिक्षक मधुकांत पठारिया यांनी मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थिनींमधील आत्मविश्वास वाढवला. त्याचप्रमाणे त्यांच्या सहकारी लक्ष्मी नाईक यांनीही प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके यांनी अध्यक्षीय भाषणातून शाहू, फूले, आंबेडकर या आदर्शाचे मौलिक विचार अंमलात आणण्यास सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण देवरे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला विकास मंचच्या प्रमुख प्रा. आदिती पांडे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. अलका शिंदे-पवार यांनी आणि आभा प्रा. सुनंदा शिंदे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner

जनतेचे जनमत

मंगळवार दि. २८ फेब्रुवारी २०२३ २

DATE :
PAGE NO

# मातोश्री महाविद्यालयात मराठी भाषा दिन जल्लोषात साजरा



कल्याण : २७ फेब्रुवारी हा दिवस कविवर्य वि.वा.शिरवाडकर यांचा जन्म दिवस महाराष्ट्रात सर्वत्र मराठी भाषा गौरव दिवस म्हणून साजरा केला जातो. शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया महाविद्यालयात मराठी विभाग व आय.क्यू.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून शहाड येथील मधुसुदन चौक ते महाविद्यालय अशा मार्गाने ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या ग्रंथ दिंडीत विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी पारंपरिक वेशभूषा करून मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

पालखी मध्ये कुसुमाग्रज यांची प्रतिमा, संविधान ग्रंथ, ज्ञानेश्वरी, डॉ. गिरीश लटके लिखित 'के ४६' असे ग्रंथ ठेऊन टाळ मृदुंगाच्या तालावर नाचत फुगड्या घालत त्यांची मिरणुक काढण्यात आली. पालखी सोहळा असे कार्यक्रमाचे स्वरूप आल्याने शहाड गावातील सर्व वारकरी आपल्या टाळ-मृदुंगासह सहभागी झाले. त्यामुळे मिरवणुकीला दिंडीचे स्वरूप येऊन शहाडगाव अभंग ओव्या, टाळ मृदुंगाच्या यांच्या आवाजाने दुमदुमून गेला. या ग्रंथ दिंडीत स्थानिक माजी नगरसेवक गणेश कोट, संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके, प्राचार्य डॉ. अरुण देवरे तसेच सर्व शाखांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

ग्रंथदिंडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापकांनी खूप मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व वारकऱ्यांचा महाविद्यालयातर्फे शाल देऊन डॉ. गिरीश लटके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला व ग्रंथ दिंडी कार्यक्रम समन्वयक डॉ. चिंतामण भोईर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

# नवराष्ट्र

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मातोश्री महाविद्यालयाचे सुयश




कल्याण, (वा.) मुंबई विद्यापीठ ठाणे झोन व श्रीमती जानकीबाई रामा साळवी महाविद्यालय कळवा आयोजित मुंबई विद्यापीठ ठाणे झोन आंतर महाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकत्याच जानकीबाई रामा साळवी महाविद्यालय कळवा या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेत मातोश्री महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये राममनोहर भगत - ८३ किलो वजन गट सुवर्णपदक, अक्षय कुमार प्रजापती - ७४ किलो वजन गट कांस्यपदक, साक्षी मोरे - ५७ किलो वजन गट कांस्यपदक, श्रुती मोरे - ६९ किलो वजन गट सुवर्णपदक, शाहिद शेख - १२० किलो वजन गट सुवर्णपदक अशी कामगिरी केली आहे. तसेच राममनोहर भगत, शाहिद शेख, श्रुती मोरे यांची मातोश्री महाविद्यालयात १७ व १८ जानेवारी रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी ठाणे झोन च्या संघात निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.गिरीश लटके, संचालक एस.एस.शिवशरण, मातोश्री वेलबाई देवजी हरीया वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रा.कोमल चंदनशिवे, क्रीडा प्रशिक्षक प्रा.नवनाथ गायकर व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# लोकमत

## मातोश्री महाविद्यालयाला पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत पाच पदके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कल्याण :** मुंबई विद्यापीठ ठाणे झोन व श्रीमती जानकीबाई रामा साळवी महाविद्यालय, कळवा आयोजित मुंबई विद्यापीठ ठाणे झोन आंतरमहाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ६ ते ७ जानेवारीला कळवा येथे पार पडली. या स्पर्धेत मातोश्री महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तीन सुवर्णपदक, दोन कांस्यपदक पटकावली.

१२० किलो वजनी गटात शाहीद शेख याने, ८३ किलो वजनी गटात राममनोहर भगत याने तसेच ६९ किलो वजन गटात श्रुती मोरे यांनी सुवर्णपदक, ७४ किलो वजनी गटात अक्षयकुमार प्रजापती आणि ५७ किलो वजनी गटात साक्षी मोरेने कांस्यपदक पटकावले. १७ व १८ जानेवारीला मातोश्री महाविद्यालयात होणाऱ्या स्पर्धेसाठी ठाणे झोनच्या संघात राममनोहर भगत, शाहीद शेख आणि श्रुती मोरे यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके, संचालक एस. एस. शिवशरण, मातोश्री वेलबाई देवजी हरिया वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रा. कोमल चंदनशिवे, क्रीडा प्रशिक्षक प्रा. नवनाथ गायकर व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

Scanned with OKEN Scanner

जनतेचे जनमत

# भारतीय कायद्यांबाबत गंभीरतेने विचार करण्याची गरज

## डॉ. गिरीश लटके लिखित के ४६ पुस्तकाच्या प्रकाशन वेळी न्यायमूर्ती बबन गोसावी यांचे प्रतिपादन



**कल्याण :** एके ४७ च्या जमान्यात के ४६ पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. या निमित्ताने ब्रिटीशकालिन भारतीय कायदे बदलण्याबाबत गंभीर विचार झाला पाहिजे असे प्रतिपादन न्यायमूर्ती बबन गोसावी यांनी केले आहे.

शाहू शिक्षण संस्थेचे सचिव तसेच पु. ल. कट्टा कल्याणचे सदस्य डॉ. गिरीश लटके यांना विपश्यना केंद्र इगतपुरी येथे विपश्यना करते वेळी आलेले अनुभव, अडथळे, मनातील आंदोलने यावर आधारित के ४६ ह्या पुस्तकाचे प्रकाशन शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री प्रा.लक्ष्मण ढोबळे यांचे शुभहस्ते आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे नुकतेच संपन्न झाले. डॉ. गिरीश लटके यांच्या बहुचर्चित मौनानंतरच्या कविता या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन देखील करण्यात आले. त्यासमयी न्यायमूर्ती गोसावी बोलत

भारतीय कायद्यांमध्ये ग्राहकांच्या बाजूचे आणि व्यापारी चोर तर मालक भाडेकरु वादात ग्राहकांच्या बाजूने कायदे आहेत. ब्रिटीश कालिन कायदे आपण जसेच्या तसे स्विकारले, या कायद्याचा पुन्हा एकदा विचार केला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन न्यायमूर्ती गोसावी यांनी केले. पुस्तकात कविता मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत असेही न्यायमूर्ती गोसावी यांनी सांगितले.

निसर्गाचा समतोल

गरजेचे आहे. तसे सामाजिक समतोल राखण्यासाठी माणूसकीचे जतन करणे गरजेचे आहे आणि ती माणुसकी डॉ. लटके यांनी आपल्या सामाजिक कार्यातून आणि लिखाणातूनही जपली आहे असे माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी सांगितले. त्यांची ही दोन्ही पुस्तके माणूसपण जपणारी आहेत असे गौरवोद्गार काढले. तर प्रा. दामोदर मोरे यांनी के ४६ पुस्तकाची अर्थपूर्ण मुखपृष्ठच पुस्तकातील आशय सांगायला मदत [illegible] असे आपल्या भाषणात नमूद

केले. यावेळी न्यायमूर्ती हभप. बबन गोसावी, अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू विजयकुमार चौबे यांचा मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी विचारमंचावर हिंदी कवी विजय पंडित, उद्योगपती गोपाळशेठ चव्हाण, शाहू शिक्षक संस्था कल्याणचे अध्यक्ष जयंतभाई हरिया आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी डॉ. गिरीश लटके यांच्या लेखन प्रवासाचा व सामाजिक कार्याचा आढावा घेत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. चिंतामण भोईर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध सूत्रसंचालक, कवी, नाट्यकर्मी सुधीर चित्ते यांनी केले. यावेळी पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन अभिनेते सुधाकर वसईकर यांनी करून रसिकांची दाद मिळवली.

सदर कार्यक्रमास शुभेच्छा देण्याकरिता शेखर लटके, लोककवी प्रा. प्रशांत मोरे, कवी रमेश आव्हाड, हिंदी कवी मुन्ना पांडे, कवयित्री छाया कोरेगावकर, बाबा रामटेके, राजू रणदिवे, नाट्यलेखक, कवी रमेश करमरकर, सार्वजनिक कल्याणचे सचिव भिकू बारस्कर आदी साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य सूर्यकांत भोसले, प्रा. कल्पना सोमनाचे, प्रा. वैशाली पाटील, कोमल चंदनशिवे, सुधाकर वसईकर, प्रा. महेंद्र भावसार, अर्जुन डोमाडे, अनिल बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner

# मुंबई विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मातोश्री महाविद्यालयाचे सुयश




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**कल्याण :** मुंबई विद्यापीठ ठाणे झोन व श्रीमती जानकीबाई रामा साळवी महाविद्यालय कळवा आयोजित मुंबई विद्यापीठ ठाणे झोन आंतर महाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दिनांक ६ ते ७ जानेवारी दरम्यान श्रीमती जानकीबाई रामा साळवी महाविद्यालय कळवा या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेत मातोश्री महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये राममनोहर भगत - ८३ किलो वजन गट सुवर्णपदक, अक्षय कुमार प्रजापती- ७४ किलो वजन गट कांस्यपदक, साक्षी मोरे - ५७ किलो वजन गट कांस्यपदक,

श्रुती मोरे - ६९ किलो वजन गट सुवर्णपदक, शाहीद शेख - +१२० किलो वजन गट सुवर्णपदक अशी कामगिरी केली आहे. तसेच राममनोहर भगत, शाहिद शेख, श्रुती मोरे यांची मातोश्री महाविद्यालयात दि.१७ व १८ जानेवारी रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी ठाणे झोन च्या संघात निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.गिरीश लटके, संचालक एस.एस.शिवशरण, मातोश्री वेलबाई देवजी हरीया वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रा.कोमल चंदनशिवे, क्रीडा प्रशिक्षक प्रा.नवनाथ गायकर व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Scanned with OKEN Scanner